# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

१३ वा मजला, केंद्र. क्र.१, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४००००५

**दूरध्वनी :** ०२२-२२१६ ३९६४ /६५/६९ , **फॅक्स :** २२१६३९७६

**ई-मेल :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in

**संकेत-स्थळ :** www.mercindia.org.in/www.merc.gov.in


जाहीरात क्र. ११/२०१८-१९

## जाहीर सुचना

**प्रारुप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट च्या जवाहरलाल नेहरु पोर्ट, तालुका उरण, जिल्हा - रायगड येथील विशेष आर्थिक क्षेत्रासाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २०१८ वर जनतेकडून अभिप्राय मागविण्याबाबत**

जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट यांना भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालयाकडून विशेष आर्थिक क्षेत्र (एसईझेड) अधिनियम, २००५ अंतर्गत सवरकहर, कराळ, सोनारी आणि जसखार गावे, तालुका उरण, जिल्हा - रायगड येथे स्थित विशेष आर्थिक क्षेत्राकरिता "विकासक" म्हणून अधिसूचित करण्यात आले आहे.

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ (बी) सह एसईझेड अधिनियम, २००५ च्या कलम ४ मधील उप-कलम (१) नुसार, जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट हे, भारत सरकारच्या एसईझेड अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या एसईझेड क्षेत्रातील ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्यासाठी वीज वितरण यंत्रणेचे संचालन आणि देखभाल करण्याकरिता, एक मानीव वीज वितरण परवानाधारक आहेत. आयोगाने, सन २०१८ च्या प्रकरण क्र. ४७ मध्ये दि. १४ जून, २०१८ रोजी दिलेल्या आदेशान्वये जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट यांच्या मानीव वितरण परवानाधारकाच्या दर्जास पुष्टी दिली आहे.

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १६ अंतर्गत, आयोगाने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (जवाहरलाल नेहरु पोर्ट, तालुका उरण, जिल्हा - रायगड येथील विशेष आर्थिक क्षेत्रासाठी लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी ) विनियम, २०१८ चे प्रारुप तयार केले आहे. या प्रारुप विनियमांची प्रत आयोगाच्या **www.mercindia.org.in/www.merc.gov.in** या संकेत-स्थळांवर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे. उपरोक्त प्रारुपावर अभिप्राय, सूचना किंवा हरकती (१+६ प्रतींमध्ये), **सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, यांना १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई – ४००००५** येथे व्यक्तिशः किंवा पोस्टाने किंवा फॅक्स किंवा ई-मेल (फॅक्स-०२२-२२१६३९७६; ई-मेल : **mercindia@merc.gov.in)** द्वारा या पत्त्यावर दि. **२८ ऑक्टोबर, २०१८** रोजी किंवा त्यापूर्वी मिळतील अशा रीतीने पाठवाव्यात.

**२८ ऑक्टोबर, २०१८** रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त झालेल्या सर्व सूचना आणि/ किंवा हरकती आयोगाद्वारे विचारात घेतल्या जातील.

**दिनांक : २८ सप्टेंबर, २०१८** — **सचिव**

**ठिकाण : मुंबई** — **महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**

Shalini